# भारतातील असंघटित कामगारांच्या समस्या: एक विश्लेषण

**धनंजय प्रकाश अडेलकर**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना:**

असंघटित कामगार म्हणजे ज्यांना रोजगाराचे तात्पुरते स्वरुप, अज्ञान, आणि निरक्षरता, व्यवसाय आणि कामाचे विस्कळीत व लहान स्वरुप, कामाच्या स्वरुपामुळे मालकवर्गाकडे एकवटलेल्या शक्ती अशा समस्यांमुळे सामुदायिक उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यात अडचणी येतात; व ते संघटित होऊ शकत नाहीत. सर्व प्रथम असंघटीत कामगार असा असंघटीत कामगार असा शब्द प्रयोग केथ हार्ट यांनी १९७१ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेमार्फत आयोजित केलेल्या परिषदेमध्ये करण्यात केला. असंघटीत कामगार या संकल्पनेबाबत विविध तज्ज्ञांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. या संकल्पनेबाबत अस्पष्टता दिसून येत असली तरी साधारणपणे एकूण कामगारांमधून संघटीत क्षेत्रातील कामगार वजा केल्यास उर्वरित कामगारांना असंघटीत कामगार म्हणता येईल.

**असंघटीत कामगारांचा इतिहास:**

भारतात पूर्वीच्या काळातील ग्रामीण भागात बलुतेदारी पद्धती आणि कामाच्या विभागणीनुसार बहुतेक सर्वजण कोणत्या ना कोणत्या व्यवसायात काम करत असत. त्या प्रकारच्या व्यवसायातील काम करणाऱ्या लोकांची वैशिष्ट्ये : ते व्यवसाय जातींनुसार ठरलेले असत; त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या ठराविक जातींचे लोक तेच व्यवसाय करीत; जातीपद्धतीचे तोटे आणि चटके या व्यवसायांतील/जातींच्या लोकांना बसत. काही खेड्यापाड्यांतून, आदिवासी भागांतून ही कामे करणारे लोक आजही आढळतात, पण त्यांचे प्रमाण कमी होत आहे. व्यवसायानुसार असंघटीत कामगारांचे अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, मासेमारी करणारे, जनावरांचे संगोपन करणारे, विडी व्यवसायातील कामगार, बांधकामावर काम करणारे, जनावरांच्या चामड्याचे काम करणारे, विणकाम करणारे, कारागीर, विटा व दगडखाणीत काम करणारे, लाकडे कापण्याच्या मिलमध्ये काम करणार अशांचा अंतर्भाव होतो तर रोजगाराच्या स्वरूपानुसार बांधील शेतकामगार, वेठबिगार, स्थलांतरित कामगार, कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाची कामे करणारे मजूर असे प्रकार पडतात. तर इतर प्रकारात आपत्तिग्रस्तस्वरूपाचे कामगार , ताडी गोळा करणारे, सफाई कामगार,

ओझी वाहणारे, हमाल, जनावरांच्या गाड्या हाकणारे, सुइणी, घरकाम करणारे, नाभिक, भाज्या व फळविक्रेते, वर्तमानपत्रविक्रेते यांचा समावेश होतो.

**भारतातील असंघटित कामगारांच्या समस्यांचे विश्लेषण:**

शेतीची होत जाणारी दुरावस्था तर दुसरीकडे भारत देशाची वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढत जाणारी बेरोजगारी, वाढत्या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे नवनवीन उद्योगधंद्याना मिळालेली चालना, वाढते शहरीकरण व शहरात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधीमुळे आज मोठ्या प्रमाणावर ग्रामीण ते शहरी असे स्थलांतर होताना दिसून येते. याचा विपरित परिणाम शहरी भागातील जीवनमानाच्या गुणवत्तेवर झालेला दिसून येत आहे. यातूनच असंघटित कामगारांची संख्या वाढते व त्यांच्या समस्यांमध्ये भर पडते.

असंघटीत कामगारांना अन्न वस्त्र निवारा या मानवाच्या मूलभूत व इतर गरजा पूर्ण करतांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. असंघटित कामगार हे विखुरलेले आणि विस्कळीत आहेत; अनेकजण सामाजिकदृष्ट्याही मागासलेले आहेत; कमी आणि अनिश्चित उत्पन्नामुळे, दारिद्र्याच्या विळख्यात ते आणि त्यांचे कुटुंबीय सापडले आहेत; शिक्षण आणि आत्मविश्वास यांचा अभाव त्यांच्यात आढळतो. कामगारांना रोजगाराच्या शोधात अनेकांना स्थलांतर करावे लागते. अशिक्षितपणा आणि निरक्षरता यांमुळे त्यांच्या समस्यांची तीव्रता अधिक वाढते. मालक-नोकर संबंध उघडउघड दिसत नाहीत त्यामुळे बहुतेक ठिकाणी अशा मजुरांचे शोषण होते. ग्रामीण भागात झोपडपट्टीत, गावाच्या बाहेर तर शहरी भागात शहरी भागाच्या बाहेर झोपडी, तात्पुरते शेड अशा स्वरुपाची व्यवस्था त्यांना स्वत:ला करावी लागते. अगदी बोटावर मोजण्याएवढे कामगारांची निवासाची सोय असते. इथे त्यांना वीज, पाणी व शौचालय या कुठल्याही प्रकारची सोय उपलब्ध नसते. दिवसभर अतिशय काबाडकष्ट केल्यावर या कामगारांना रात्री सारे काही अंधारात काम करावे लागते.

भारतात नागरी व ग्रामीण भागात चांगल्या वस्तीत राहणाऱ्या नागरिकांना सुध्दा पाण्याची सुविधेसाठी झगडावे लागते. प्रसंगी त्यासाठी भरमसाठी पैसे खर्च सुध्दा करावे लागतात. कामगारांचे कामही अतिशय कष्टाचे व सतत धूर, धूळ आणि आगीशी संपर्कामुळे या कामगारांना आंघोळ करणे अपरिहार्य असते. असंघटित कामगारांना वीजेच्या समस्येला तोंड द्यावे लागते. अगदी मोजक्याच घरात वीजेच सोय असते. असंघटित कामगारांची निवास व्यवस्था ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे व त्याची कोणतेही कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना वीज जोडणी मिळत नाही.

असंघटीत कामगारांना एकाच ठिकाणी कायमस्वरुपी काम असतेच असे नाही. एखाद्या ठिकाणचे काम पूर्ण झाले की, त्यांना इतरत्र काम शोधावे लागते. काही वेळा दुसऱ्या ठिकाणी सहज काम मिळते तर तर काही वेळेस त्यांना मुकादमाच्या मर्जीनुसार दुसऱ्या ठिकाणी काम करावे लागते. त्यामुळे अशा वेळेला या कामगारांवर काही दिवस तसेच कामाविना दिवस काढावे लागतात.

कामगारांना बऱ्याच वेळेस सुमारे ११ ते १२ तास सलग काम करावे लागते. त्याव्यतिरिक्त जास्त काम केल्यास त्या कामाचे त्यांना मजुरीच्या अर्धे पैश्याप्रमाणे त्या तासांचा हिशोब केला जातो. त्यांना ठरलेल्या रोजगारीच्या अर्धेच पैसे दिले जातात. यांना कधी पैशाची गरज पडली तर कुठल्याही प्रकारची मदत दिली जात नाही. कामगारांचे जेवढे कामाचे दिवस भरलेले असतीतल व त्या भरलेल्या दिवसांची जी रक्कम होत असेल तेवढीच रक्कम या कामगाराला मिळू शकते त्या व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे पैसे या कामगारांना मिळत नाही.

असंघटीत क्षेत्रातील कामगारांना रोजगारातील संधी कमी असणे, कमी उत्पन्न आणि ग्रामीण भागांतील विषमतेमुळे कमी उत्पन्न आणि ग्रामीण भागांतील विषमतेमुळे अनेक आर्थिक समस्या निर्माण होतात. शेतमजुर हे असंघटित, विखुरलेले असतात. सौदा करण्याची त्यांची शक्ती फार कमी असते. त्यांच्या कामाचे स्वरूप तात्पुरते हंगामी असते. रोजगार मिळविण्यासाठी अगदी इतर राज्यातही अनेकांना स्थलांतर करावे लागते. औद्योगिकीकरण व लोकसंख्येची वाढ या गोष्टीमुळ प्रदुषणात वाढ होत असते. या दोन्हीतील बदलांचा परिणाम हा मानवी जीवनावर होत असतो. सतत आग, विविध प्रकारचे वायू व रासायनिक द्रव्ये व आजूबाजूच्या परिसराचा कामगारांच्या आरोग्यावरही परिणाम होत असतो.

**समारोपः**

बहुतांशी कामगारांमधे एकजुटीचा अभाव आहे कारण त्यांच्या हक्कासाठी त्यांना उद्भवणाऱ्या प्रश्नांविरुद्ध लढा देणाऱ्या संघटनांचा अभाव जाणवतो. त्यामुळे कधी एखादा प्रसंग निर्माण झाला तर या कामगारांच्या पाठीशी उभे राहणारे कोणी नसते. प्रश्न हा त्या कामगारांचा वैयक्तिक असो की सामुदायिक असो. जरी एखाद्या प्रश्नाविरुद्ध कामगारांनी एकत्रितपणे येऊन आवाज उठविण्याचा प्रयत्न केला तर मालक वर्गाची दडपशाही हा उठलेला आवाज मोडून काढते. राष्ट्राच्या आणि समाजाच्या अर्थव्यवस्थेत मोलाची भर टाकणारे असंघटित क्षेत्रांतील कामगार या लाभांपासून वंचित राहतात. त्यांचे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक जीवन, सुखी-समृद्ध व्हावे, सामाजिक न्यायाचा खऱ्या अर्थाने प्रसार व्हावा, त्यांच्या राहणीमानाचा

दर्जा उंचावावा आणि त्यातून उत्पादनक्षमताही वाढावी; पर्यायाने देशाचाही विकास व्हावा या दृष्टीने असंघटित कामगारांसाठी केवळ कल्याणाच्या पलीकडे, कामातील सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षा पोहोचली पाहिजे, त्याची योग्य अंलबजावणी झाली पाहिजे.

**संदर्भः**


- राष्ट्रीय कामगार आयोग अहवाल (१९६९): श्रम मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली
- सिरसाठ, सतीश (२०१०): असंघटित कामगार, पुणे विद्यापीठ, पुणे
- लुले वसंत -संपादक (१९८८): कामगार चळवळ : २००१ आव्हाने आणि आवाहने, वसुधा प्रकाशन, नागपूर
- इथापे, एन.के. (२०१६): कामगार कायदे - भाग ३, चेतक बुक्स, पुणे
- बेडदे, धनंजय (१९९५): औद्योगिक समाजशास्त्र, विद्याभारती प्रकाशन, लातुर
- National Commission on Labour, Government of India, Delhi.
- Rajeshkumar (2008): Social Security of Contractual Workers, Concept Publishing Company, New Delhi
- Sacchidananda (2001): People at the Bottom-A Portrait of a Scavengers: Concept Publishing Company, New Delhi
- Sunanda Sen (2009): Unfreedom and Waged Work, Labour in India's Manufacturing Industry, SAGE Publications Pvt. Ltd, CA, USA